नि.फौ.खटला क्र.११५/२०२०
सरकार / शुभम चव्हाण
निशाणी क्र.३४

साक्षीदार क्र.४ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – सोमनाथ प्रकाश गायकवाड
वडिलांचे नाव – प्रकाश गुलाब गायकवाड
वय – २५ वर्षे
धंदा – गवंडी काम
राहणार – प्रकाशवाडी, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**सरतपास सहा. सरकारी वकील श्रीमती ए. पी. केसकर यांचेमार्फत शपथेवर सुरु**

१. माझ्या घरी मी, मावशी, आई, पत्नी असे असतो. घटना दिनांक २३/०६/२०२० रोजी दुपारी १२ वाजता घडलेली होती. सदर दिवशी मी व सागर सुभाष चव्हाण असे चहाच्या टपरीवर बसलो होतो. त्यावेळी शुभम चव्हाण याने 'आमची वाळूची गाडी धरुन देणार आहे का' असे विचारले व त्याने आम्हाला हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आम्ही रणधीर देवकर यांना फोन लावला. त्यानंतर रणधीर देवकर हे शुभम चव्हाण याचे वडील मधुकर चव्हाण यांना विचारायला गेले असता तुम्ही आम्हाला विचारणारे कोण असे म्हणून आम्हाला मधुकर चव्हाण, शुभम चव्हाण, विशाल चव्हाण यांनी दांडक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी रणधीर देवकर यांच्या डोक्याला लागले तसेच मला मुक्कामार लागला होता. त्यावेळी सुभाष चव्हाण व त्यांची आई मिटवण्यासाठी आले. त्यानंतर मी, रणधीर देवकर, सागर चव्हाण असे आम्ही पोलीस स्टेशनला आलो.

२. पोलीस स्टेशनला आल्यानंतर पोलीसांनी गुन्हा दाखल करुन घेतला. त्यानंतर आटपाडी येथील सरकारी दवाखान्यात गेलो असता त्यांनी आम्हा तिघांना पुढील उपचारासाठी सांगली येथील सिव्हील हॉस्पीटल येथे पाठवण्यात आले. घटनेच्या अनुषंगाने पोलीसांनी माझा जबाब नोंदवलेला आहे. आता मला आर्टीकल MO-1 ते 3 वरील काठ्या दाखवण्यात आल्या. आम्हाला याच काठ्यांनी मारहाण करण्यात आलेली होती. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आहे. इतर आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.व्ही.पाठक यांचेमार्फत सुरु**

३. माझे शिक्षण बारावी नापासपर्यंत झालेले आहे. मला वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गवंडी काम करतो. सागर सुभाष चव्हाण हा माझा सख्खा चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, पमा शंकर देवकर ही सुभाष चव्हाण यांची सासू व रणधीर देवकर यांची आई आहे. हे म्हणणे खरे आहे की, रणधीर, सागर, सोमनाथ, पमा हे आम्ही सर्व एकमेकांचे नातेवाईक आहोत.

४. माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे 'आम्ही चहाच्या टपरीवर बसलो होतो' असे मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते. परंतु तसा मजकूर माझ्या पोलीसांसमोरील जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, २०२० हे साल कोरोना महामारीचे साल होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० साली सर्व बंद होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, थोडे उघडलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२० साली लोकांनी घराच्या बाहेर पडू नये असा शासनाचा आदेश होता. हे म्हणणे खरे नाही की, संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२९/२०२० असा खटला माझ्याविरुध्द भा.दं.वि. कलम १८८, २७९ या कलमाखाली दाखल झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर खटल्यात

मी गुन्हा कबूल करुन ५ हजार रुपये दंड भरला होता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझी गाडी पकडली असल्यामुळे सदरचा खटला माझ्याविरुध्द दाखल करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१२२/२०२० हा खटला देखील माझ्याविरुध्द दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात मी दीड हजार रुपये दंड भरला होता किंवा कसे हे मला आठवत नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, कोरोना कालावधीमध्ये एकमेकांपासून अंतर ठेवा, हस्तांदोलन करु नका, मास्क वापरा असे शासनाचे नियम होते. हे म्हणणे खरे आहे की, कोरोनाच्या भितीमुळे लोक एकमेकांच्या घरी जात नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, घटनेवेळी थोडेफार उघडले होते.

६. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाशवाडीपासून पोलीस स्टेशन जवळच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळी कसा जबाब द्यायचा, कशी फिर्याद द्यायची याबाबत चर्चा केली. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाशवाडी येथील बालाजी मंदीराच्या आसपास राहती लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, बालाजी मंदीराच्या समोरुन आटपाडी गावात जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता हा थोडा नादुरुस्त, खड्डे पडलेला, उखडलेला असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याच्या पूर्वेला लोकांची दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रणधीर याला रक्ताची जखम नव्हती.

७. (साक्षीदाराला आर्टीकल MO–1 to 3 वरील काठ्या दाखविण्यात आल्या.) हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल MO–1 to 3 वरील कोणत्याही काठीला रक्त लागलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, उपरोक्त काठ्या बुरुडांकडे विक्रीसाठी उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे आहे की, शेळ्या मेंढ्या गुरे राखणा–यांकडे अशा प्रकारच्या काठ्या असतात. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २३/०६/२०२० रोजी रणधीर शुध्दीवर होता. आम्ही पोलीस स्टेशनला सकाळी

८ ते ९ वाजताच्या सुमारास पोलीस स्टेशनला पोहोचलो. आम्ही आधी दवाखान्यात गेलो व त्यानंतर पोलीस स्टेशनला गेलो. पोलीस स्टेशनला जाण्यापूर्वी संपूर्ण रात्र आम्ही दवाखान्यात होतो. मला मुक्कामार लागलेला असल्यामुळे माझ्यावर दवाखान्यात उपचार केला नाही. दवाखान्यात गेल्यानंतर काय घडले हे मी स्वतः डॉक्टरांना सांगितलेले नाही.

८. मला याची माहिती नाही की, शुभम चव्हाण याचे वडील पायाने आधू आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः घटनेची फिर्याद दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोरोना कालावधीमध्ये शासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन चौकामध्ये फेरफटका मारत असताना पोलीसांनी कारवाई केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस मागे लागल्यामुळे आम्ही पळत सुटलो. हे म्हणणे खरे नाही की, पळताना पडलयामुळे मुक्कामार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, सोबत रणधीर व सागत पळत असल्यामुळे त्यांनाही मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, झालेल्या जखमांचा गैरफायदा घेवून आम्ही आरोपींविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात आरोपींच्या हिताविरुध्द सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.04.24 16:48:14 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : २४/०४/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****